# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 04/01/2022 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### मोबाईल चोरीचा आरोपी जेरबंद
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक 28/09/2021 चे 13.47 रोजी फिर्यादी नामे कु. रोहीणी प्रभाकर रेहपाडे वय 19 वर्ष रा. पांजरेपार ता. भिवापुर हिला अनोळखी इसम वय अंदाजे 24 ते 25 वर्ष लाल टि शर्ट काळा पॅट व गळयात पिवळा दुपट्टा घातलेला याने तिला 'भावासोबत बोलायचे आहे' असे कारण सांगुन फिर्यादीचा मोटरोला पावर लाईट कंपनीचा मोबाईल कि. 6,000/–रू. घेतला व चोरून घेउन गेला. अश्या फिर्यादीच्या रिपार्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे अप.क्र. 683/21 कलम 379 भादवी अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपासात मा. पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने उमरेड उपविभागातील पो. स्टे उमरेड हद्दीत गस्त करीत असतांना माहितगार कडून गोपनीय माहिती मिळाली की, उमरेड करांडला गावातील आरोपी नामे– विजय गोविंदराव वाडवे, वय 27 वर्ष रा. करांडला ता उमरेड जिल्हा नागपुर हा चोरीचा मोबाईल वापरत आहे. अशा खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने मिळालेल्या माहिती प्रमाणे वरील इसम यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने मोबाइल चोरीचा असल्याचे कबूल केले. सदर मोबाईल हा पोलीस स्टेशन उमरेड येतील अप क्र 683/21 कलम 379 भा.द.वि चे गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील योग्य कायदेशीर कारवाईस्तव पोलीस स्टेशन उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे स्था.गु.शा. यांचे नेतृत्वात सहा.पो.नि. जितेंद्र वैरागडे, पोहवा नरेंद्र पटले, पोशी अजीज दुधकानोज, बालाजी साखरे, चापोहवाध्भाऊराव खंडाते पोशिध्सतिश राठोड (सायबर सेल नागपूर ग्रामीण) यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर